# प्रेरणा को–ऑप. बँक लि.

# Prerana CO-OP. BANK LTD.

**मुख्य कार्यालय : लक्ष्मणनगर, डांगे चौक, थेरगांव, पुणे–४११ ०३३**

☎ 9075028001 / 2 **Website :** www.preranabank.com


# वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

## (फक्त सभासदांकरीता)

प्रेरणा को–ऑप बँक लि., थेरगांव, पुणे या बँकेची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरूवार दि.३१/०८/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता, प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड, पुणे–४११०३३ येथे खालील विषयांवर कामकाज करण्यासाठी घेण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

## ❊ कार्यक्रम पत्रिका ❊

१) मागील दि.२४ सप्टेंबर २०२२ रोजी झालेल्या चोविसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) मा. संचालक मंडळाने तयार केलेला वर्ष २०२२–२०२३ चा वार्षिक अहवाल, ३१ मार्च २०२३ चा ताळेबंद आणि वर्ष २०२२–२३ चे नफा तोटा पत्रक स्वीकृत करणे व सभासदांकडून अहवालासंबंधी आलेल्या लेखी प्रश्न/सूचनांचा विचार करणे.

३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या वर्ष २०२२–२०२३ च्या नफा वाटणीस मंजुरी देणे.

४) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या वर्ष २०२३–२०२४ च्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे. तसेच वर्ष २०२२–२३ च्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.

५) मा. वैधानिक लेखा परिक्षक यांचेकडून आलेल्या वर्ष २०२२–२३ या वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे व वर्ष २०२१–२२ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती पूर्तता अहवालाची नोंद घेणे.

६) मा. संचालक मंडळाने वर्ष २०२३–२०२४ या वर्षाकरीता रिझर्व्ह बँकेच्या धोरणा नुसार केलेल्या वैधानिक लेखा परिक्षकांच्या नियुक्तीस व मेहेनतान्यास मान्यता देणे.

७) वर्ष २०२३–२०२४ या वर्षाकरीता नेमणूक केलेल्या अंतर्गत व कंकरंट लेखा परिक्षकांच्या नियुक्तीस व मेहेनतान्यास मान्यता देणे.

८) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम (७५) नुसार बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची माहिति घेणे.

९) सेवकांच्या रचनेस मान्यता देणे.

१०) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांच्या लेखी अर्जानुसार त्यांची अनुपस्थिती मंजूर करणे.

११) मा. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा विनिमय करणे.

स्थळ : पुणे
दिनांक : १४/०८/२०२३

मा.संचालक मंडळाच्या आज्ञेवरून
**श्री. तानाजी सोनवणे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**विशेष सुचना :**

१) गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच दिवशी सकाळी १०.३० वाजता सभा घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

**सभासदांसाठी सुचना :**

१) सभेस येताना सदर अहवालाची प्रत कृपया सोबत आणावी तसेच सभेच्या ठिकाणी उपस्थितांची नोंद करुन उपस्थितीचे प्रमाणपत्र घ्यावे.

२) काही कारणाने आपण सभेस उपस्थित राहू शकत नसल्यास तशी लेखी विनंती बँकेच्या मुख्य कार्यालयात द्यावी.

३) ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार जो सभासद सलग ५ वर्षातील किमान एका तरी वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहीला नसेल व या पाच वर्षात बँकेच्या किमान एकातरी सेवेचा लाभ घेतला नसेल अशा सभासदास अक्रियाशील सभासद म्हणून गणले जाईल.

४) अहवाला विषयी किंवा हिशोब पत्रकाविषयी सभासदांना काही सूचना करावयाच्या असल्यास किंवा प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी दि. २०/०८/२०२३ पर्यंत बँकेच्या कामकाजाच्या वेळेत मुख्य कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे लेखी स्वरुपात द्याव्यात. अहवाल पोस्टाने व ई – मेलद्वारे सभासदांना पाठविले आहेत. बँकेचा वर्ष २०२२–२३ चा अहवाल बँकेच्या www.preranabank.com या वेबसाईटवर उपलब्ध केला आहे तो पहावा.